# चोर माहुली येथील लिंबू उत्पादक शेतकरी कोरोनामुळे संकटात



नांदगाव खंडेश्वर दि.३० : तालुका प्रतिनिधी अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोर या गावातील बरेच शेतकरी लिंबूचे उत्पादन घेतात. सध्या त्यांच्या शेतातील लिंबू तोडीला आले आहेत. परंतु संचार बंदीमुळे ते आपला माल विकून शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे खूप मोठे नुकसान होत आहे. याबाबत शासनाने मदत करावी अशी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची मागणी आहे.

माहे मार्च ते जून या काळात लिंबू फळाला बाजारात मोठी मागणी असते. त्यामुळे शेतकरी आपल्या लिंबू बगिचाची जोपासणा करुन माल तयार करतात. यावर्षी सद्यस्थितीयेथील ययाच शेतकऱ्यांच्या बगिचातील माल तोडीला आला आहे. परंतु सध्या संचारबंदी असल्यामुळे ते आपला माल बाजारात विकू शकत नाही. ज्या शेतकऱ्यांनी अगोदरच आपला बगिच्या व्यापाऱ्यांना विकला आहे असे व्यापारीसुद्धा माल न तोडता सौदा रद्द करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी अशी मागणी येथील शेतकरी नकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी अशी मागणी येथील शेतकरी अंकुश झंझाट, विपीन काकडे, अंकुश कोल्हे, सुधीर कोरडे, सुनील तिखीले, नरेंद्र तिखिले आदी शेतकऱ्यांनी केली आहे.

# आसेगाव येथे कर्तव्यावरील पोलिसांना मास्क व सॅनिटायझरचे वाटप

(किशोर मोकलकर)

आसेगावपूर्णा दि.३० : स्वतःचे घरदार सोडून केवळ नागरिकांना कोरोना या विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी अहोरात्र कर्तव्यावर असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना दर्यापूर मतदार संघाचे आमदार बळवंतराव वानखडे यांनी आसेगाव पोलिस स्टेशनला भेट देऊन येथील कर्मचाऱ्यांना मास्क व सॅनिटायझरचे मोफत वाटप केले.

संपूर्ण देशभरात कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. याला आळा घालण्यासाठी शासनाने कडेकोट उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांनी घराबाहेर पडू नये,याकरिता वारंवार सूचना देण्यात येत आहेत. संपूर्ण जिल्ह्यात संचारबंदी लागू असून,कोणालाही अकारण घराबाहेर फिरण्यास प्रतिबंध करण्यासाठी चौका चौकांमध्ये पोलिस



बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.मात्र जे पोलीस कर्मचारी आज संचारबंदी दरम्यान रात्रंदिवस एक करून जनतेची सुरक्षा करतात, त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आमदार बळवंत वानखडे यांनी सदर उपक्रम राबविला.आमदारांनी पुढाकार घेऊन हा उपक्रम राबविल्या बद्दल आसेगाव पोलिसांनी त्यांचे आभार मानले.

# नामदेव गाथेतील 'श्रीराम माहात्म्य'

**चैत्री नवरात्रानिमित्त हे नवरात्र म्हणजेच रामाचे नवरात्रही आहेच. त्या निमित्त ही लेखमाला**

## राजा म्हणे कैसे विपरीत झाले

नामदेवरायांनी आपली रामकथा अतिशय संक्षिप्त स्वरुपात पण साक्षेपाने सादर केली आहे. त्यांच्या एकेका अभंगातून रामायणातील महत्वाची पात्रे आपल्यापुढे सामर्थ्याने उभी राहतात.



कौसल्येच्या पोटी परब्रह्म अवतरणार आहे याचा बोध तिला झाला. पण बुद्धिमान राजाला झाला नव्हता. त्याला असेच वाटत होते.... कौसल्या काहीतरीच बडबडते आहे. तिला भूतबाधाच झालेली असली पाहिजे. आता आपण गुरु वसिष्ठ मुनींना बोलवायला पाहिजे. तशी त्याने आपल्या सेवकांना आज्ञाही दिली.

परब्रह्म पूर्ण आलें माझे घरी । न कळे अंतरीं नृपाचिया ।।
करीति बडबड होती भूतचेष्टा । पाचारा वसिष्ठा लवकरी ।।

राजाज्ञेप्रमाणे वसिष्ठ झाले. त्यांनी कौसल्येला पाहिजे. त्यांना जाणवले... तिचे अष्टसात्विक भाव दाटून आले आहे. तिचे बोलणे, काही सांगणे भूतबाधेचे नाही. ते सहज स्वाभाविक आहे. न राहवून ती बोलते आहे.

येऊनि वसिष्ठ पाहे कौसल्येसी । नावरती तिथेसी अष्टभाव ।।
राजा म्हणे कैसें विपरित झालें । वसिष्ठा झडपिलें महाभूते ।।

राजाला वसिष्ठमुनींनी तसे सांगितले तेव्हा राजाला ते पटले तर नाहीत. उलट मुनींनाच महाभूताने झपाटलेले दिसते आहे, असे राजाला वाटले. त्यानंतर त्यांच्या मनात जे पूर्ण कृत्य खदखदत होते ते असे प्रकट झाले...

श्रावण वधाचे अद्य नाही जळालें । दुजें हे निर्मिले प्रारब्धासी ।।
ऐकतांचि हांसे सावध होऊनि । बोलतसे क्षणीं नामा म्हणे ।।

माझ्याकडून मातृपितृ भक्त श्रावणबाळाचा वध झाल्याचे पाप अजूनही मला भोवते आहे असे दिसते. म्हणूनच हे नवे विपरीत भाग्य माझ्यासमोर उभे राहिले आहे.

दशरथाचा हा पश्चात्ताप कौसल्येला समजला आणि ती पुन्हा सावध होऊन राजाला सांगू लागली. तुम्हाला वाटते ती वस्तूस्थिति नाही.खरोखरीच परब्रह्माचा अवतार आपल्या घरी व्हावयाचा आहे.

# त्या आठशे निराश्रीतांसाठी आमदार बनले देवदूत

## जबलपूर, हैद्राबाद सुरत मध्ये विद्यार्थ्यांना मदत

(कमल छांगाणी)

धामणगाव रेल्वे दि.३० : घरातील सर्व धान्य संपले चार दिवसांपासून घरात खायला अन्नाचा एक कण नाही, त्यातच या अनोळखी शहरात बाहेर पडले तर पोलिसांचे मिळणारे दंडुके या काळात जवळ ना जन्मदाते, ना जवळ मित्र-मैत्रिणी व नातेवाईक या विश्वव्यापी संकटात आपल्या भागाचा आमदारच देवदूत बनून मदत केल्याने अनेकांनी फेसबुक लाईव्ह वर आपल्या डोळ्यातील अश्रूला वाट मोकळी करून दिली.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे देशभरात लॉकडाऊन करण्यात आले देशावर आलेल्या या भयावह संकटामुळे एकीकडे हातावर पोट असणाऱ्यांसमोर रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण झाला तर अनेक रोजगार विध्यार्थी, इतर राज्यात व जिल्ह्यात अडकुन बसले या आठशे निराश्रितासाठी धामणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार अडसड देवदूत ठरले त्यांनी केलेली ही मदत आयुष्यात न विसरणारी असल्याच्या प्रतिक्रिया ऐकून अनेकांना गहिवरून आल्याशिवाय राहणार नाही.

धामणगाव विधानसभा मतदारसंघातील तिन्ही तालुक्यातील विद्यार्थी अनेक राज्यात शिक्षण घेण्यासाठी आहे कोरोणाच्या भीतीमुळे अनेक विद्यार्थी यापूर्वीच आपल्या घरी परतले मात्र एकवीस दिवसाचा लॉक डाऊन अचानक घोषित झाल्यानंतर अनेकाना संकटांना सामना करावा लागला. औरंगाबाद, हैदराबाद, जबलपूर ,सुरत, अहमदाबाद ,नाशिक, पुणे सोलापूर, औरंगाबाद जळगाव, अकोला यासह मोठ्या शहरात धामणगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक विद्यार्थी अडकून पडले या विद्यार्थ्यांच्या खिशातील पैसे संपले. घरात खायला अन्नाचा कण नाही, वाहतूक बंद असल्याने घरी येण्याचा प्रश्न गंभीर यातच आपण या अनोळखी शहरात मदत मागायची कुणाला असा प्रश्न अनेकांना पडला. अशावेळी आमदार प्रताप अडसड यांनी बाहेर गावी असलेल्या विध्यार्थ्यांच्या मदतीसाठी टीम नेमल्याचे एसएमएस समाजमाध्यमावर व्हायरल झाले. त्यानंतर अनेकांनी आपली झालेली अवस्था काही मोबाईल वरून मांडली. कोणताही वेळ वाया जाऊ न देता शासनाच्या निर्देशाचे पालन करीत काही विध्यार्थ्यांना दोन वेळेचा टिफिन तर काही विध्यार्थ्यांना गॅस शेगडी, कुणाला निवासस्थान तर कुणाला त्या भागातील किराणा भाजीपाल्यासाठी आपल्या तेथील भाजपा कार्यकर्त्याकडून व्यवस्था करून दिली. आपल्या वर ओढवलेल्या गंभीर संकटात आ प्रताप अडसड हे देवदूत कसे ठरले अश्या प्रतिक्रिया अनेकांनी आपल्या फेसबुकवर लाईव्ह व्यक्त करत डोळ्यातील अश्रुंना वाट मोकळी करून दिली.

धामणगाव विधानसभा मतदारसंघातील शहरा सोबतच प्रत्येक गावात निर्जंतुकीकरण व्हावे, स्वस्त धान्य दुकानदाराकडून ग्रामस्थांना तीन महिन्यांचे धान्य वाटप व्हावे महिला बचत गटाकडून फायनान्स कंपनीने वसुली करू नये म्हणून त्यावर नियंत्रनासाठी अशा विविध समित्या त्यांनी यापूर्वीच नेमल्या. दररोज प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून मतदार संघाचे अपडेट घेणे सुरू असतानाच जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील इतर ठिकाणी अडकलेल्या विद्यार्थ्यांनाही मदत करण्याचे अविरत काम ते करीत आहे.

# युवकांनी केली स्व:खर्चातून विषाणू प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी



दर्यापूर दि.३० : तालुक्यातील वडनेर गंगाई येथे कोरोनाला आळा घालण्यासाठी गावातील सामाजिक कार्यकर्त्यांने केली फवारणी व तेही स्वखर्चातून. गावातील सामाजिक कार्यकर्ते सागर देशमुख यांनी कोरोनाचा वाढता प्रभाव बघता स्वखर्चातून संपूर्ण गावात ट्रॅक्टरच्या सहाय्याने सँनैटायझेर फवारणी केली. आपल्या आणि आपल्या परिवारातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्या असे सांगण्यात आले.

जर कोरोना ची लक्षणे आढळून आल्यास लवकर रुग्णालयात धाव ध्या असे सुद्धा सांगण्यात आले. गावातील लोकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये असे सुद्धा आव्हान करण्यात आले. या कार्यात ऋषीकेश शेंगोकार, फैझान खान, निशांत कोथळकर, अमोल गौरकार, अनिकेत हरणे, आणि पवन देशमुख यांचे सहकार्य लाभले. तसेच वडनेर गंगाईचे सरपंच देशमुख आणि पोलीस पाटील राजेंद्र देशमुख यांनी बाहेरगावाहून आलेल्या व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांना दवाखान्यात जाऊन कोरोनाची तपासणी करण्याचे आव्हान केले. या कार्यामध्ये डॉक्टर आरोग्य सेविका आशा वर्कर यांनी मोलाचे योगदान दिले. अजूनही त्या घरोघरी जाऊन अविरत सेवा देत आहेत. गावामध्ये पंतप्रधानांनी सांगितलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होत आहे वडनेर गंगाई येथील व्यापारी वर्ग सुद्धा कोरोनाशी लढतांना गांभीर्यपूर्वक सहकार्य करीत आहे.

# रेवसा गावात कोरोना विषाणूचा धोका टाळण्यासाठी ट्रॅक्टर ने फवारणी

## पोलीस प्रशासन आरोग्य विभागाकडून गावकऱ्यांना सूचना



(सचिन ढोके)

रेवसा दि.३० : कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावातील सार्वजनिक ठिकाणी जंतू नष्ट करण्यासाठी रेवसा ग्रामपंचायतीने फवारणीचे मोहीम हाती घेतली आहे .यावेळी संपूर्ण गावाला ट्रॅक्टरच्या साह्याने आधुनिक यंत्र आणून गावातील गल्लोगल्ली सर्व वार्डमध्ये फवारणी केली आहे.

गावात स्वच्छता विषयी जनजागृती करण्यात आली. बाहेरगावावरून आलेल्या नागरिकांची तपासणी करून त्यांना प्रतिबंधात्मक सूचना आरोग्य विभागाकडून देण्यात आले. ग्रामविकास अधिकारी कोल्हे, आरोग्य अधिकारी डॉ.संजय सदाफळे, पोलीस निरीक्षक चोरमुले गावातील, पोलीस पाटील व ग्रामपंचायत सदस्य आदींनी पुढाकार घेतला आहे.

# उद्खेड येथील ॲलोपॅथी दवाखान्याची आरोग्य सभापती व माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी केली पाहणी

दर्यापूर दि.३० : मोर्शी तालुक्यातील उद्खेड येथील ॲलोपॅथी दवाखाना उपकेंद्र उदखेड येथे जिल्हा परिषद अमरावती चे आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर तसेच जिल्हा परिषद अमरावती चे माजी उपाध्यक्ष दत्ता ढोमणे यांनी भेट दिली. त्यांनी बाहेर गावावरून आलेले रुग्ण तसेच गावातील रूग्ण, गावातील स्वच्छता, दवाखान्यातील स्वच्छता याची पाहणी केली. गाव स्वच्छ व सुंदर दिसून आले. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालय उद्खेड तर्फे १४ वा वित्त आयोगामार्फत अंदाजे ३००००/- हजार रुपयांची औषधे



उदखेड येथील ॲलोपॅथी दवाखान्याला देण्यात आले. तेव्हा तेथे वैदयकीय अधिकारी करुले, गावातील सरपंच कैलास वानखडे, उपसरपंच प्रदीप भगत, पोलीस पाटील धीरज बाहेकार, तलाठी इंगळे, ग्रामसेवक, लांडे आशावर्कर अंगणवाडी सेविका, गावातील ग्रीन आर्मी टीम तसेच तहसील शिपाई अमोल टेकाडे, प्रतिष्ठित नागरिक अशोक ठाकरे इत्यादी हजर होते. जीप आरोग्य सभापती बाळासाहेब हिंगणीकर यांनी मोर्शी व वरूळ तालुक्यातील आरोग्य केंद्रांना भेटी देऊन कोरोना वायरस संबंधी उपायोजना बाबत अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून मार्गदर्शन केले.

# चांदूर रेल्वेत एचपी गॅस एजन्सीमध्ये ग्राहकांची गर्दी



(उत्तमराव गावंडे)

चांदूर रेल्वे दि.३० : सेफ डिस्टन्सवर अधिक भर देत चांदूर रेल्वे शहरात किराणा, भाजीपाला खरेदी निश्चित वेळेत सुरू आहे. परंतु चांदूर रेल्वे शहरातील वकील लाईनमधील बीटीएल एचपी गॅस एजन्सीमध्ये गुरूवारी ग्राहकांची प्रचंड गर्दी पहावयास मिळाली असुन सुरक्षित अंतराला फाटा देण्यात येत आहे. याकडे मालकाचे व संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

जिवनावश्यक वस्तुंच्या विक्रीसाठी परवानगी असतांना भाजीपाला, किराणा, दुधडेअरी, मेडीकल या दुकानात ग्राहकांची एकच गर्दी होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतल्या जात आहे. त्याचप्रमाणे न. प. कडून दुकानासमोर सुरक्षीत अंतरावर गोल आखुन त्यामध्ये ग्राहकांना उभे राहण्यात सांगत आहे. परंतु शहरातील एचपी गॅस एजन्सीत असा नियम दिसत नाही आहे. याठिकाणी ग्राहकांची एकसोबत गर्दी होत असुन सुरक्षीत अंतराच्या नियमाला खो देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाला याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

**अन् शुक्रवारी भाजीपाल्याचा भरला बाजार**

आठवडी बाजारात प्रशासनाकडून १८ भाजीपाल्यांच्या दुकानांना परवानगी देण्यात आली. परंतु शुक्रवारी याठिकाणी तब्बल ३० ते ३५ भाजीपाल्याची दुकाने थाटली होती. व प्रचंड गर्दी बाजारात झाली होती. एकप्रकारे बाजार भरल्याचेच भासावत होते. यामुळे संबंधित प्रशासनाचे नियोजन व्यवस्थित नसल्याचे दिसुन आले.

# झारखंड-इलाहाबादच्या ३६ मजुरांना तिवस्यात रोखले

## दोन्ही गाड्या तिवसा पोलिसांच्या ताब्यात



(हेमंत निखाडे)

तिवसा दि.३० : एकीकडे शासनाने कोरोना व्हायरस पासून जनतेचे संरक्षण व्हावे,याकरिता देशभरात लॉकडाऊन केले आहे आणि परराज्यातील मजुरांनी आहे तेथेच थांबावे,त्यांची निवास व जेवणाची व्यवस्था करण्याची हमी शासनाने घेतल्या नंतरही मजूर वर्ग छुप्या मार्गाने जात असल्याची बाब समोर येत आहे.तिवसा येथे सलग तिसऱ्या दिवशी सुद्धा अश्या ३६ जणांना रोखण्यात आले आहे.

शनिवारी उत्तरप्रदेश येथील १८ मजूरांचे वाहन एसडीओ फुलझेले यांनी शिवणगाव येथे रोखले,त्यानंतर रविवारी भांबोरा येथील शेतातील २० मजुर हे मध्यप्रदेश येथे जात असतांना त्यांना तिवसा पोलीस स्टेशन येथे रोखण्यात आले व त्यांची व्यवस्था भांबोरा गावात करण्यात आली तर त्यानंतर आज सोमवारी सकाळी ११ वाजताचे सुमारास ईलाहाबाद व झारखंड येथे जाणाऱ्या एकूण ३६ मजुरांच्या दोन वाहनांना मोझरी येथे पोलिसांनी रोखून त्यांची तिवसा ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली.यापैकी मिनीट्रक क्र.एमएच ०३,सिव्ही-०९८७ या वाहनाने झारखंड येथील ३० जण हायवेने प्रवास करीत होते तर ईतर ६ जण ईलाहाबाद येथील कार ने जात असताना या दोन्ही वाहनांना तिवसा पोलिसांनी मोझरी येथे रोखले.त्यांची तिवसा ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन मालुसरे व टीम ने वैद्यकीय तपासणी केल्यानंतर या सर्वांना मोझरी येथील जिल्हा परिषद शाळेत तिवसा तहसील प्रशासनाचे वतीने निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात आली.यावेळी तिवसा तहसीलदार वैभव फरतारे, ना.तहसीलदार दत्तात्रत पंधरे,ठाणेदार गोपाल उंबरकर व त्यांचे कर्मचारी उपस्थित होते.

# शासनाने दिली सूट पण... ग्राहकांची होते लूट

## भाजीपाला विक्रीवर अव्वाचे सव्वा भाव

दर्यापूर दि.३० : पूर्ण जगात कोरोना या रोगाने हाहाकार माजला असतांना आपल्या भारत सरकारने या विषाणूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी पूर्ण देश १४ एप्रिल पर्यन्त लोकडाऊन केला. अत्यावश्यक वस्तू खरेदी व विक्री साठी महाराष्ट्र शासनाने वेळेत सूट दिली. पण त्या वेळेत ग्राहकांची फार मोठ्या प्रमाणात लूट होतांना दिसत आहे. विशेषतः भाजीपाला विक्री करतांना दुकान मालक अव्वाच्या सव्वा भावाने विक्री करत आहे. टमाटर पूर्वी २० रु किलो होते तर आता ४० रु किलो, भेंडी २० रु किलो तर आता ३० रु किलो, वांगे २० रु किलो तर आता ४० रु किलो, आलू हे २० रु किलो तर आता ५० रु किलो, पालक २० रु किलो तर आता ५० रु किलो,कोबी १५ रु किलो तर आता ४० रु किलो, इत्यादी चढत्या भावाने विक्री सुरू आहे तर फळ मध्ये शेब हे पूर्वी ४० रु किलो तर आता १०० रु किलो, अंगुर ५० रु किलो तर आता १०० रु किलो,मोसंबी ही ५० रु किलो तर आता ८० रु किलो अश्या भावाने विक्री होत आहे. किराणा दुकानदार कमी फार प्रमाणात चढत्या भावाने विक्री करत आहेत व शासनाने अगोदरच जाहीर केले आहे की कोणत्याही



दुकानदाराने या गंभीर परिस्थिती चा फायदा न घेता चढत्या भावाने विक्री करू नये पण एकंदरीत शासनाने दिलेल्या सुटीचा मात्र दुकानदार फायदा घेऊन ग्राहकांची लूट होत आहे हे मात्र खरे आहे.

**रक्तदान श्रेष्ठदान**

**१००% जॉब**

१) मोबाईल रिपेअरिंग-६ महिने
२) कॉम्प्युटर हार्डवेअर-६ महिने
३) इलेक्ट्रीकल्स-६/१२ महिने
४) डिटीपी/टॅली-२ महिने
१००% जॉब
-संपर्क-
संत गाडगेबाबा इन्स्टिटयूट
बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर, रुख्मिनी नगर रोड,अमरावती.
721-2569035,8421060567

**रेडी पजेशन सेमी फर्निश्ड**

1BHK/2BHK फ्लॅटस् व शॉप्स् विकणे आहे. नविन बांधकाम, मॉड्युलर किचन, POP,जिम, लायब्ररी, सेलीब्रेशन लॉन, को-ऑपरेटिव्ह स्टोअर सुविधा उपलब्ध, कठोरा नाका रिंग रोड परिसरात.
संपर्क-9405352971
9890040307

**उपलब्ध है**

निरोगी-देसी गीर गौमाता की गुणवत्ता प्राप्त निम्नलिखित चीजे विक्री के लिए उपलब्ध है. दुध, घी, गोअर्क, धुप, दंतमंजन, हवन गोबरी, केचुआ उत्पाद, गोनाईल, दशपर्णी अर्क, किटनियंत्रक इ.
-संपर्क-
गोकुलम गौरक्षण संस्था
9665113111,9890690333, 8237691121